# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिति

## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक ५ ]

**दिनांक :१३ /७/२०१६** **वेळ : दुपारी १२.०० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जुलै २०१६ ची मासिक सभा बुधवार दिनांक १३/७/२०१६ रोजी दु. १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

1. मा. पांढरकर निलेश शंकरराव – सभापती
2. मा. पात्रे राम संभाजी
3. मा. आर.एस.कुमार
4. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
5. मा. नेटके सुमन राजेंद्र
6. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
7. मा. टेकवडे सुजाता अविनाश
8. मा. झांबरे सतिश आनंदा [ स्वीकृत सदस्य ]
9. मा. गिरीष गोपाळ कुटे [ स्वीकृत सदस्य ]

तसेच श्री. चंद्रकांत खोसे - क्षेत्रीय अधिकारी, श्री. फारुक शेख - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, श्री लियाकत पीरजादे – कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री प्रदीप पुजारी – प्रभारी कार्यकारी अभियंता झोनिपु, श्री.सुनिल वाघुंडे, श्री. हनुमंत शिंदे , श्री. बन्सल एच.पी. , श्रीम बाबर एल.एस.,श्रीम मोमीन झेड आय , श्री वैभव पुसाळकर - उपअभियंता , श्री पी.जे. कदम - लेखाधिकारी , श्री.एम.एम.शिंदे - सहा. आरोग्याधिकारी, श्री फाटक डी डी, श्री शितोळे एस के , श्री काळे एस पी – कनिष्ठ अभियंता , श्रीम डी डी गुमास्ते – कार्यालय अधिक्षक तथा अतिक्रमण प्रमुख, उपस्थित होते.

मा. सभापती , श्री. पांढरकर निलेश यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

सर्व प्रथम मागील सभेचा सभावृत्तांत [ दिनांक १५/६/२०१६ कार्यपत्रिका क्रमांक ४ ] वाचून कायम करणेत आला त्यानंतर सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक ६ : सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**
आकुर्डी गाव प्र.क्र. १६ मध्ये कै. पांडुरंग काळभोर सभागृह असून तेथे आता विभागीय करसंकलन कार्यालय झाले असून ते नागरिकांना सापडत नसलेने मारुती मंदीर चौक, नवनाथ चौक, शिवशक्ती चौक पुढे जगताप वाडा या ठिकाणी दिशादर्शक फलक करसंकलन ऑफिसकडे असे लावणेत यावेत.

**विषय क्रमांक ७ : सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**
आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ येथे गणेश व्हीजन येथे नव्याने सुरु करण्यात आलेले क्रिडांगण [ आ.क्र. १७१ ] याला **कै. निवृत्ती भालेराव क्रिडांगण** असे नाव देणेत यावे.

**विषय क्रमांक ८ : सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**
आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ मध्ये नवीन प्ले ग्राऊंड तयार करणेसाठी कोठेही शासकीय रिझर्व्हेशन नाही. त्यामुळे वॉर्डात येणा-या दळवीनगर आकुर्डी पुलाजवळील जागेतून १८ मी. डी.पी. रोड असून त्यामध्ये दोन ते अडीच एकर जागा ही प्रायव्हेट मालकीची असून त्याचा सर्व्हे नंबर १७३ हा आहे. त्या जागेत बेकायदा लाकडाची वखार असून ती जागा ३७/१ खाली रिझर्व्हेशन टाकून आरक्षित करणेत यावी. सदर ठराव मंजुर करुन कायम होण्याची वाट न पाहता महापालिकेकडे अंमलबजावणीसाठी ताबडतोब पाठविण्यात यावा.

**विषय क्रमांक ९ : सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा** प्रस्ताव
प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावामध्ये कै. वसंतदादा पाटील ही शाळा आहे. त्या शाळेच्या भिंतीच्या बाहेर तेथे महिलांसाठी स्वच्छतागृह बांधण्यास मान्यता देणेत यावी. प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावामध्ये महिलासाठी एक ही स्वच्छतागृह नाही. तरी सहकार्य करावे.

**विषय क्रमांक १० : सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**
प्रभाग क्रमांक १६ आकुर्डीगाव येथे कै. पांडुरंग काळभोर सभागृह असून तेथे नवीन ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र होत असून सदर विरंगुळा केंद्रास **कै. निवृत्तीबुवा भालेराव ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र** असे नामकरण करणेत यावे.

**विषय क्रमांक ११ : सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डीगाव येथे अनेक वर्षापासून आकुर्डी प्रसूतीगृह रुग्णालय आहे. वरील हॉस्पिटलसाठी गावचे दानशूर कै. केशव नामाजी पाटील यांनी महापालिकेस स्वत:ची १० गुंठे जागा मोफत दिली असून सदर हॉस्पिटलचे नामकरण त्यांच्या मातोश्री **कै. गिताबाई नामाजी काळभोर पाटील** असे देण्यात यावे.

**विषय क्रमांक १२ : मा. अध्यक्ष, निलेश पांढरकर यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाण मधील रस्ते/ चौक इ. चे खालील प्रमाणे नामकरण करणे.

1. आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ येथे गणेश व्हिजन याठिकाणी नव्याने सुरु करण्यात आलेल्या उदयानाला [ आरक्षण क्रमांक १७१ ] **कै. तूळसाआई पांढरकर उदयान** असे नामकरण करावे.

2. आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ गंगानगर येथील गगनगिरी व्यापारी संकुलाचे नावामध्ये बदल करुन त्याठिकाणी **कै. कैलास शंकरराव पांढरकर व्यापारी संकुल** असे नामकरण करणेत यावे.

3. आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ मधील गंगानगर येथील आदर्श मित्र मंडळाचे गणेश मंदिर परिसरातील चौकाला **आदर्श गणपती चौक** असे नामकरण करणेत यावे.

वरील प्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक : २३ विषय क्रमांक : १

दिनांक : १३/७/२०१६ विभाग :

सुचक : मा. आर एस कुमार अनुमोदक : मा. भालेराव प्रतिभा

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास “हस्तीमल शेठ गादिया मार्ग” असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : २४ विषय क्रमांक : २

दिनांक : १३/७/२०१६ विभाग :

सुचक : मा. सुजाता टेकवडे अनुमोदक : मा.प्रतिभा भालेराव

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

शुभारंभ कॉलनी, स.नं. (१३१/२ व १३०/१ मधील) यास शुभारंभ कॉलनी असा नामफलक बसवून मिळणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक : २५ विषय क्रमांक : ३
दिनांक : १३/७/२०१६ विभाग :

सुचक : मा. प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा. आर एस कुमार

संदर्भ : मा. चारुशीला कुटे, नगरसदस्या यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील नाना स्मृती मंगल कार्यालया मागील लक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर पासून ते चर्च पर्यंतच्या रस्त्याला " कै. गणपतराव ज्ञानदेव चव्हाण " तसेच उत्कर्ष क्लासेस ते सेंट्रल बँक या अंतर्गत रस्त्याला " कै. चंपालाल जैन मार्ग " तसेच विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूने श्रीकृष्णनगर पर्यंत जाणा-या रस्त्यास " कै. संपत उमाजी माने मार्ग " व शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्याला " कै. बाळासाहेब रंगनाथ जाधव मार्ग " , आदर्श मित्र मंडळ समोरील रस्त्यास " कै. ह. भ. प. चांगदेव दादा काकडे " आणि विघ्नहर गणेश मंदिर ते दक्षिण मुखी मारुती मंदिर अंतर्गत रस्त्यास " कै. सुषमाताई विनायक जोशी मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : २६ विषय क्रमांक : ४
दिनांक : १३/७/२०१६ विभाग :
सूचक : मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा. सुमन नेटके
संदर्भ : मा. संगितांताई भोंडवे, नगरसदस्या यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

रावेत बीआरटीएस रोडवरती श्री. बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगितांताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलकाशेजारील चौकास " कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक " असे नाव देण्यात यावे. तसेच सोनटक्के वस्ती सर्व्हे १२/५ रावेत या ठिकाणी " यशवंत नगर , सोनटक्के वस्ती " असे नामकरण करणेत यावे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेची वेळी करणेत यावा.
ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : २७ विषय क्रमांक : ५

दिनांक : १३/७/२०१६ विभाग :

सूचक : मा. आर एस कुमार अनुमोदक : मा. भालेराव प्रतिभा

संदर्भ :- मा. सविता साळुंके, नगरसदस्या यांचा दिनांक १५/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २७ मोरवाडीमध्ये निगडी दापोडी हा बीआरटीएस रस्ता जात आहे. या रस्त्यावर नजीकच्या भविष्यात बीआरटीएस बससेवा चालू करणेत येणार आहे. या रस्त्यावरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकामध्ये बँक ऑफ महाराष्ट्रचे समोर बीआरटीएस बसथांबा आहे. याठिकाणचे बसथांब्याला **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक / Punyashloak Ahilyadevi Holkar Chouk** असे नाव देणेबाबत विचार करणे व या करीता पुणे महानगर परिवहन महामंडळ [ PMPML ] कडून वेगळी मान्यता घेणेची वाट न पाहणेबाबत विचार करणे .

**तसेच** याच चौकामधील ग्रेड सेपरेटरला **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समतल विगलक / Punyashloak Ahilyadevi Holkar Grade Separator** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

ठराव क्रमांक : २८ विषय क्रमांक : ६

दिनांक : १३/७/२०१६ विभाग :

सूचक : मा. भालेराव प्रतिभा अनुमोदक : मा. निलेश पांढरकर

संदर्भ :- **सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**

आकुर्डी गाव प्र.क्र. १६ मध्ये कै. पांडुरंग काळभोर सभागृह असून तेथे आता विभागीय करसंकलन कार्यालय झाले असून ते नागरिकांना सापडत नसलेने मारुती मंदीर चौक, नवनाथ चौक, शिवशक्ती चौक पुढे जगताप वाडा या ठिकाणी **करसंकलन ऑफिसकडे असे** दिशादर्शक फलक लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

ठराव क्रमांक : २९ विषय क्रमांक : ७

दिनांक : १३/७/२०१६ विभाग :

सूचक : मा. भालेराव प्रतिभा अनुमोदक : मा. निलेश पांढरकर

संदर्भ :- **सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**

आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ येथे गणेश व्हीजन येथे नव्याने सुरु करण्यात आलेले क्रिडांगण [ आ.क्र. १७१ ] याला **कै. निवृत्ती भालेराव क्रिडांगण** असे नाव देणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३० | विषय क्रमांक | : ८ |
| दिनांक | : १३/७/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. भालेराव प्रतिभा | अनुमोदक | : मा. निलेश पांढरकर |

संदर्भ :- **सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**

आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ मध्ये नवीन प्ले ग्राऊंड तयार करणेसाठी कोठेही शासकीय रिझर्व्हेशन नाही. त्यामुळे वॉर्डात येणा-या दळवीनगर आकुर्डी पुलाजवळील जागेतून १८ मी. डी.पी. रोड असून त्यामध्ये दोन ते अडीच एकर जागा ही प्रायव्हेट मालकीची असून त्याचा सर्व्हे नंबर 173 आहे. त्या जागेत बेकायदा लाकडाची वखार असून ती जागा ३७/१ खाली रिझर्व्हेशन टाकून आरक्षित करणेस मान्यता देणेकामी सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता नजीकचे मा. शहर सुधारणा समितीमार्फत मा. महापालिका सभेपुढे मान्यतेकामी पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे .

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३१ | विषय क्रमांक | : ९ |
| दिनांक | : १३/७/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. भालेराव प्रतिभा | अनुमोदक | : मा. निलेश पांढरकर |

संदर्भ :- **सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावामध्ये महिलांसाठी एक ही स्वच्छतागृह नसल्याने कै. वसंत दादा पाटील शाळेच्या भिंतीच्या बाहेर महिलांसाठी स्वच्छतागृह बांधण्यास मान्यता देण्यात येत आहे .

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३२ | विषय क्रमांक | : १० |
| दिनांक | : १३/७/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. भालेराव प्रतिभा | अनुमोदक | : मा. निलेश पांढरकर |

संदर्भ :- **सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डीगाव येथे कै. पांडुरंग काळभोर सभागृह असून तेथे नवीन ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र होत आहे. सदर विरंगुळा केंद्रास **कै. निवृत्तीबुवा भालेराव ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे .

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३३ | विषय क्रमांक | : ११ |
| दिनांक | : १३/७/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. भालेराव प्रतिभा | अनुमोदक | : मा. निलेश पांढरकर |

संदर्भ :- **सन्मा. सदस्या, प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डीगाव येथे अनेक वर्षापासून आकुर्डी प्रसूतीगृह रुग्णालय आहे. वरील हॉस्पिटलसाठी गावचे दानशूर कै. केशव नामाजी पाटील यांनी महापालिकेस स्वत:ची १० गुंठे जागा मोफत दिली असून सदर हॉस्पिटलचे नामकरण त्यांच्या मातोश्री **कै. गिताबाई नामाजी काळभोर पाटील** असे करणेस मान्यता देण्यात येत आहे .

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३४ | विषय क्रमांक | : १२ |
| दिनांक | : १३/७/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक | : मा. भालेराव प्रतिभा |

**संदर्भ :- मा. निलेश पांढरकर , अध्यक्ष, अ प्रभाग समिती यांचा दि. १३/७/२०१६ चा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाण मधील रस्ते/ चौक इ. चे खालील प्रमाणे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

1. आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ येथे गणेश व्हिजन याठिकाणी नव्याने सुरु करण्यात आलेल्या उदयानाला [ आरक्षण क्रमांक १७१ ] **कै. तूळसाआई पांढरकर उदयान** असे नामकरण करणे.

2. आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ गंगानगर येथील गगनगिरी व्यापारी संकुलाचे नावामध्ये बदल करुन त्याठिकाणी **कै. कैलास शंकरराव पांढरकर व्यापारी संकुल** असे नामकरण करणेत करणे.

3. आकुर्डी गाव प्रभाग क्रमांक १६ मधील गंगानगर येथील आदर्श मित्र मंडळाचे गणेश मंदिर परिसरातील चौकाला **आदर्श गणपती चौक** असे नामकरण करणे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या मासिक सभेचे कामकाज होऊन मा.सभापती यांनी प्रस्तुत ची सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
( निलेश शंकरराव पांढरकर )
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/३०८/२०१६
दिनांक : २/८/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

प्रति,
सर्व संबंधित विभाग